**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण-२०१२**
**शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविणा-या शाळांना अनुदान.**

# महाराष्ट्र शासन
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## शासन निर्णय क्रमांकः राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२५९/क्रीयुसे-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
तारीख: २६ फेब्रुवारी, २०१४

**वाचा -**

१) शासन निर्णय क्रमांकः समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, राक्रीधो-१०९६ /प्र.क्र.३०३ /क्रीयुसे-१ दिनांक ३१ जुलै, १९९७
२) शासन निर्णय क्रमांकः शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रीडाधो-२०११/प्र.क्र.५५/क्रीयुसे-१, दिनांक १४ जून, २०१२.

**प्रस्तावना -**

खेळाडूंच्या अंगी असलेले क्रीडा कौशल्य दाखविण्यासाठी क्रीडा स्पर्धांचा फार चांगला उपयोग होते. भारतीय शालेय खेळ महासंघ पुरस्कृत शालेय मुलां / मुलींच्या विविध खेळांच्या विविध वयोगटातील तालुका, जिल्हा, विभाग, राज्य व राष्ट्रीयस्तर या क्रमाने क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. तालुका, जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांच्या मुलां / मुलींचा सहभाग होण्याच्या दृष्टिकोनातून शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याची योजना वरील क्र. १ येथील शासन निर्णयान्वये कार्यन्वित आहे. परंतू सदर योजनेत शालेय १४ वर्षातील कबड्डी, मैदानी मुलां / मुलींच्या व मुलांच्या कुस्ती जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त शाळांचा विचार करण्यात आलेला आहे. विविध खेळांच्या शालेय क्रीडा स्पर्धांचे १४,१७,१९ वर्षाआतील मुला / मुलींच्या वयोगटात आयोजन करण्यात येतात आणि प्रत्येक वयोगटात आयोजन करण्यात येतात आणि प्रत्येक वयोगटातील क्रीडा स्पर्धेस वयाबरोबर वर्गाची सुध्दा गट आहे. प्रत्येक शाळेत १४,१७,१९ वर्षाचे मुलां/मुलींचे सांधिक / वैयक्तिक खेळाडंचे खेळाडू असतीलच असे नाही. शालेय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालयातील मुला / मुलींनी सहभाग घ्यावा. या दृष्टिकोनातून शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना प्रोत्साहित करण्याकरिता २०१२ क्रीडा धोरण समितीने जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील सर्व खेळांची सर्व वयोगटातील कामगिरीचा विचार करून तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील पदक विजेते खेळाडू तयार केलेल्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना प्रोत्साहनात्मक अनुदान देण्याविषयी शिफारस केलेली आहे. क्रीडा धोरण समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने प्रचलित योजनेमध्ये कालानुरुप सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने या योजनेबाबतचा दि.३१.७.१९९७ चा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत आहे.

## शासन निर्णय -

या योजनेस जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये प्रविण्य मिळविणा-या शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान, असे संबोधण्यात यावे.

सदर नियम शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून पुढील आदेश होईलपर्यंत अंमलात राहतील.

२. **अनुदानासाठी पात्रता :-**

भारतीय शालेय खेळ महासंघाद्वारे पुरस्कृत राज्य शासनाकडून आयोजित शालेय क्रीडा स्पर्धेतील जिल्हास्तरावर १४,१७,१९ वर्षे वयोगटाखालील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणा-या शाळा / वरिष्ठ महाविद्यालय संलग्न कनिष्ठ महाविद्यालये प्रोत्साहनात्मक अनुदानासाठी पात्र ठरतील.

३. **क्रीडा प्रकार :-**

भारतीय शालेय खेळ महासंघाद्वारे पुरस्कृत १४,१७,१९ वर्षाआतील सर्व क्रीडा प्रकार प्राविण्यानुसार निवडीसाठी ग्राहय धरण्यात येतील.

गुणांकणाची पध्दत त्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या सर्व खेळांच्या सांघिक जिल्हास्तरीय विजयी संघाला १० गुण, उपविजयी संघास ७ गुण, व तृतीय क्रमांकाच्या संघाला ५ गुण तर वैयक्तिक क्रीडा स्पर्धातील जिल्हास्तरीय स्पर्धेची सर्वसाधारण विजेतेपद निश्चित करून प्रथम क्रमांकास १० गुण, द्वितीय क्रमांकास ७ गुण, तृतीय क्रमांकास ५ गुण देण्यात येतील.

४. **प्रोत्साहनात्मक अनुदानासाठी शाळेची निवड करण्यासाठी निकष पुढीलप्रमाणे रहातील :-**

i. जिल्हास्तर - १४, १७ , १९ वयोगटातील मुले व मुलींच्या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील खेळ निहाय कामगिरीनुसार उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे गुण प्रदान करण्यात यावे. त्यानुसार प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी राहतील.

ii. राष्ट्रीयस्तर - शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त क्रीडा प्रकारात सहभागी होऊन पदक प्राप्त करणा-या राज्यातील सर्वोत्कृष्ट तीन शाळां.

iii. आंतरराष्ट्रीयस्तर - शालेय आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन प्रथम तीन क्रमांक पर्यंत प्राविण्य मिळविणा-या खेळाडू विद्यार्थ्यांच्या शाळेस, व ४ ते १० पर्यंत क्रमांक संपादन करणा-या खेळाडूंच्या शाळा.

५. **अनुदानाची रक्कम :**

i. जिल्हास्तर - जिल्हयातील प्रतिगट निहाय पहिल्या तीन क्रमांकाच्या शाळांना प्रथम क्रमांकास रू. १.०० लक्ष, द्वितीय क्रमांकास रू. ०.७५ लक्ष व तृतीय क्रमांकास रू. ०.५० लक्ष प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येईल.

ii. राष्ट्रीयस्तर - शालेय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त क्रीडा प्रकारात सहभागी होऊन प्राविण्य प्राप्त राज्यातील सर्वोत्कृष्ट तीन शाळांना रू. २.०० लक्ष प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येईल.

iii. आंतरराष्ट्रीयस्तर - शालेय आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊन प्रथम तीन क्रमांक पर्यंत प्राविण्य मिळविणा-या खेळाडू विद्यार्थ्यांच्या शाळांना रू. ७.०० लक्ष व ४ ते १० क्रमांकापर्यंत पदक विजेते खेळाडू तयार करणा-या शाळांना रू. ३.०० लक्ष.

६. **<u>खर्चाच्या ग्राह्य बाबी -</u>**

मंजूर झालेल्या प्रोत्साहनात्मक अनुदानातून संबांधित शाळेने खाली नमूद केलेल्या वेगवेगळ्या बाबींवर खर्च करणे बंधनकारक राहील व त्याबद्दलचे विनियोग प्रमाणपत्र जिल्हा क्रीडा अधिकारी यांना देणे आवश्यक राहील.

i. क्रीडागंणाची देखभाल व दुरूस्ती.
ii. क्रीडा साहित्याची खरेदी.
iii. क्रीडा वाड्मय पुस्तके, नियतकालिके यांची खरेदी
iv. क्रीडा विषयक ध्वनीचित्रफितीची खरेदी.
v. खेळाडूंचे प्रशिक्षण व प्रशिक्षकाचे मानधन.
vi. संबंधित खेळाडूंना गणवेश व रोख पारितोषिक.

७. **<u>शाळांची निवड करणारे अधिकारी :-</u>**

जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी वर नमूद केलेले बाबींच्या अधीन राहून प्रोत्साहनात्मक अनुदानासाठी पात्र शाळांचे प्रस्ताव संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे पाठविणे आवश्यक राहील. विभागीय उपसंचालक यांनी प्राप्त प्रस्तावाची छाननी करुन आयुक्त / संचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या मान्यतेने अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घ्यावयाचा आहे.

८. **<u>या स्पर्धांसाठी विहित केलेले देय अनुदानाचे तपशील खालीलप्रमाणे अनुज्ञेय राहील.</u>**

**(अ) जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेती शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान.**

| वयोगट | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|---|
| १४ वर्षाखालील | १.०० | ०.७५ | ०.५० | २.२५ |
| १७ वर्षाखालील | १.०० | ०.७५ | ०.५० | २.२५ |
| १९ वर्षाखालील | १.०० | ०.७५ | ०.५० | २.२५ |
| एकूण | ३.०० | २.२५ | १.५० | ६.७५ |
| रू. ६.७५ X ३५ जिल्हे | | | | रू. २३६.२५ |

**(ब) राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान.**

राज्यातील सर्वोत्कृष्ट ३ शाळांना रु. २.०० लक्ष याप्रमाणे रु.६.०० लक्ष कमाल अनुदान अनुज्ञेय राहील.

**(क) आंतरराष्ट्रीय स्तरावरील शालेय क्रीडा स्पर्धेतील पदक विजेती शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान.**

भारतीय शालेय महासंघ प्रतिवर्षी एक ते दोन क्रीडा प्रकारात आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतो, हे विचारात घेऊन प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक संपादन करणा-या शाळांना कमाल रु. ७.००

लक्ष व ४ ते १० क्रमांक संपादन करणा-या शाळांना कमाल अनुदान रु.३.०० लक्ष असे एकूण रु.१०.०० लक्ष प्रोत्सहानात्मक अनुदान देय होईल.

अनुदान मंजुरीचे अधिकार संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांना प्रदान करण्यात येत आहेत.

संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर नियमात अंशतः / पूर्णतः बदल अथवा शिथील करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास राहतील.

या प्रयोजनार्थ होणारा खर्च पुढील लेखाशिर्षामधून त्या-त्या वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा. -२२०४- क्रीडा व युवक सेवा, १०४-क्रीडा व खेळ, पंचवार्षिक योजनांर्तगत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (२०) माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय व खेळाचे प्रचालन (२०) (०२) माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय व खेळाचे प्रचलनासाठी प्रोत्साहनात्मक अनुदान (२२०४-५६६२)

हे आदेश शासन निर्णयाच्या दिनांकापासून अंमलात येतील व पुढील आदेश होईपर्यंत अंमलात राहतील.

सदरहू शासन निर्णय नियोजन विभागाच्या संमतीने तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८७/व्यय-५ दिनांक ०८.०२.२०१३ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२६१६१७१०८४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajshekhar Chandrakant Patil

Digitally signed by Rajshekhar Chandrakant Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Rajshekhar Chandrakant Patil
Date: 2014.02.26 17:28:15 +05'30'

(रा.चं.पाटील)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई,
४. प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
५. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

७. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, पुणे,
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
९. महालेखापाल (लेखा व परिक्षा ),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर
१०. नियोजन विभाग (का.१४७१ )मंत्रालय,मुंबई
११. वित्त विभाग ( व्यय-५),मंत्रालय,मुंबई
१२. संचालक,प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण,पुणे
१३. सर्व उपसंचालक,क्रीडा व युवकसेवा (संचालनालयमार्फत),
१४. सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी (संचालनालयमार्फत),
१५. ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई,
१६. मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई,
१७. मा. राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई,
१८. निवड नस्ती (क्रीयुसे-१,क्रीयुसे-२ व क्रीयुसे-३)